# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २१६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०४/२०१८

**१) संगनमत करून शासकीय कामात अडथळा करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून लोखंडी रॉडने मारण्यास धावल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक २४/०४/२०१८ चे २१.१५ वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हे डी.ओ. डयुटीवर हजर असतांनी कारधा टी पॉइंट येथे अपघात झाल्याचे फोनवरून घटना स्थळी स्टॉप सह गेले असता, दुधाचा टॅक्टर एमएच ४० वाय ८९३१ चे चाकामध्ये १ स्त्री चाकाखाली मृत अवस्थेत असल्याने, पर्याय व्यवस्थेकरीता क्रेनला बोलावुन आपले कर्तव्यपार पाडीत असता यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीचे शासकीय कामात अडथळा निर्माण करून फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व लोखंडी रॉडने मारण्यास धावल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. मनगटे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३५३,२९४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. लांडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून नापास करण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक ०७/०४/२०१८ चे पुर्वी पासुन दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन पिडीत मुलगी ही शाळेत शिक्षण घेत असुन यातील आरोपी शिक्षक याने अश्लिल बोलुन व तिच्याशी अश्लिल हाव भाव करून तिचा विनयभंग केला, व लैगिक हमला व छळवणुक करून नापास करण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवही येथे कलम ३५४,(अ)(१)(४),५०४ भादवी. सहकलम ८,१२ लै.अ.बा.सं.अधी. २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. म्हसैकर पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**३) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २४/०४/२०१८ चे १२.०० वाजता. दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीचे घरासमोरील खुट उपडल्याचे कारणा वरून हटकले असता, यातील फिर्यादीला आरोपीने अश्लिल शब्दात शिवीगाळ केले.फिर्यादीचे पत्नीने आरोपीला हटकले असता आरोपीने अश्लिल शब्दात बोलुन तसेच घरच्या लोकांना जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २९४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**४) ट्रक पलटी होवुन ट्रकमधील जनावरांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २५/०४/२०१८ चे ०७.३० यातील आरोपी ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रकमध्ये कोबुंन भरलेले ९ हल्ले, २ म्हशी असे एकुण ११ जनावरे भरून त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने ,निष्काळजीपणे चालवुन ट्रक पल्टी झाल्याने, ट्रकमधील जनावरांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी महेश आसाराम आकरे वय ३९ वर्ष रा. लाखनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९ भांदवि. सहकलम ११(१)(५) प्रा.क्रू.वा.कायदा सहकलम ८३/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ.ऊईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**५) मोटार सायकलच्या धकडेत ४ जखमी :—**

दिनांक २५/०४/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकलवर तीन सिट बसवुन एनएच ०६ रोडने आपले साईड सोडुन विरूध्द दिशेने त्याचे ताब्यातील वाहन चालवीत नेवुन साकोली कडुन येणाऱ्या मोटार सायकलला धडक मारून मोटार सायकल चालकास व त्याचे मोटार सायकलवर बसलेल्या २ महिलांना व स्वत: दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने जखमीचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९, ३३७,३३८ भांदवि. सहकलम १८४,१२८/१७७,२/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**६) कारच्या धडकेत १ जखमी:–**

दिनांक २५/०४/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील जखमी हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ५६६७ ने महालगाव वरून पहेला कडे मोठया भावाचे लग्नाकरीता जात असतांनी यातील समोरून येणाऱ्या आरोपी कार चालकाने त्याचे ताब्यातील कार निष्काळजीपणे चालवुन मोटार सालकला धडक दिल्याने फिर्यादी हा खाली पडुन पायाला व शरीराला मार लागल्याने, त्यास औषधोपाचारा करीता सा.रू. भंडारा येथे भरती केले असे जखमी फिर्यादी प्रकाश केवळ मरूले वय २७ वर्ष रा. पहेला यांचे बायाण व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९, ३३७ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**७) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २५/०४/२०१८ चे १६.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक वाहन सन फ्लॅग गेट समोर वरठी येथे सार्वजनीक रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करुन मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना.शेंडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठ येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना.शेंडे पोलीस स्टेशन वरठी करीत आहेत.

**८) अवैध दारु /जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक २५/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी, कारधा, वरठी, तुमसर, सिहोरा, आंधळगाव, भंडारा व दिघोरी येथे अवैध हातभट्टी +देशी दारू/जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण १२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५१८ लिटर हातभंट्टी दारू + २५० किलो मोहफुला + ७५० किलो सडवा मोहा + साहीत्य किंमती १,०८,४५०/रु. व १५ लिटर १२० मिली लिटर देशी+ विदेशी दारु किंमती ४,९९०/–रु. तसेच जुगारातुन ६८,१९३/रु. असा एकुण किंमती १, ८१,६३३/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २५/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक– ०२ तीन सिटर वाहनाकरीता– ११८ ईतर वाहनांवरती – ०९ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनी. माया चाटसे)
महिला सेल भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.